राष्ट्रीय मासिक

# विश्वात्मक लोकस्वामी वार्ता

RNI No.MAHBIL/2019/79644

POSTAL REGD.NO. MCW 348/2024-26

Published on 10th of Every Month

Posted at Dharavi Post Office,Mumbai-400 017 on 15th of Every Month.

•www.vishwatmaklokswamivarta.com •वर्ष : ५ वे •अंक : ५ •मुंबई, मार्च २०२४ •पृष्ठ : १२ •मूल्य :₹३/- •संपादक : चंद्रशेखर लिंगय्या स्वामी

## लोकसभा निवडणुक २०२४ ची तयारी

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामाचा धुमधडाका

**मुंबई (विशेष प्रतिनिधी):** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकास राज्यातील विकास कामाचा धुमधडाका सुरू झालेला आहे. अनेक शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारी यंत्रणा कामाला लागलेली आहे.



मौजे दरे येथील बांबू मूल्यवर्धन केंद्र आणि टसर रेशीम शाश्वत रोजगार व वनसंवर्धन प्रकल्पाचे लोकार्पण व गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बांबू लागवडीस व रेशीम उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी महाबळेश्वर तालुक्यातील मौजे दरे तर्फ तांब येथे बांबू मूल्यवर्धन केंद्र आणि टसर रेशीम शाश्वत रोजगार व वनसंवर्धन प्रकल्प साकारण्यात आला आहे. शेतकरी, तसेच महिला व युवकांना कृषी व वनउपज उत्पादनासाठी पूरक रोजगार मोठी संधी उपलब्ध होणार आहे. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत कोयना धरणातील गाळ काढण्यात येणार आहे. टरस (वन्य) रेशीम शाश्वत रोजगार व संवर्धन प्रकल्पाचे मुख्यमंत्री यांचे वडील संभाजी शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण, सह्याद्री पर्वतरांगातील शेतकऱ्यांसाठी टरस रेशीम शेती वरदान ठरेल. →पान १० वर

## मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवरील गाळेधारकांना दिलासा मिळावा

### विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर



**मुंबई :** मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवरील निवासी आणि व्यापारी भाडेधारकांना दिलासा मिळावा यादृष्टीने महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९च्या कलम ३ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असून त्यासाठी तातडीने अध्यादेश काढण्यात यावा, अशी विनंती विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. मुंबईत कुलाबापासून शिवडीपर्यंत मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवर सुमारे ४००० इमारती उभ्या असून त्यात हजारो कुटुंबांच्या निवासी आणि व्यापारी आस्थापना आहेत. अशा हजारो कुटुंबांना महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९ च्या सवलतींचा लाभ मिळत नाही याउलट अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या कायद्यामध्ये दुरुस्ती सुचविणारा अध्यादेश काढला गेल्यास, संबंधितांना दिलासा मिळू शकेल. हा अध्यादेश निघेपर्यंत कोणाही भाडेधारकास बेघर करण्यात येऊ नये अशी मागणीही विधानसभा अध्यक्ष अड. नार्वेकर यांनी केली आहे. महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९ अन्वये घरभाडे, घरमालक आणि भाडेकरु यासंदर्भातील बाबींचे नियंत्रण करण्यात येते. या कायद्यान्वये घरमालक आणि भाडेकरु अशा दोघांचे हक्क सुरक्षित करण्यात आले आहे. →पान १० वर

## मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर झाल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार

**मुंबई :** २० फेब्रुवारीला झालेल्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देणारे विधेयक एकमताने मंजूर झाले. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गासाठी यापुढे होणाऱ्या नोकर भरतीप्रक्रियेत आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये २६ फेब्रुवारी २०२४ पासून १० टक्के आरक्षण विहित केले आहे. तसेच ज्या मराठा बांधवाच्या कुणबी नोंदी मिळाल्या त्यांचे दाखले



देण्यात आले, त्याबद्दल मुख्यंमत्ती एकनाथ शिंदे व उपमुख्यमत्ती देवेंद्र फडवणीस यांचे आभार व सत्कार मुबईमध्ये घेण्यात येणार आहे.यासाठी तारीख आणि वेळ मिळावी म्हणून पत्र व्यवहार केला आहे, अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले ) मराठा आघाडी व मराठा प्रतिष्ठानचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब मिरजे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. →पान १० वर

## तुरुंगात असलेल्या संत आसाराम बापू यांच्या प्रकृतीची योग्य तपासणी करण्याची भक्तांकडून मागणी

**मुंबई :** बापू आसाराम यांची प्रकृती गंभीर आहे, त्यांच्या इच्छेनुसार उपचार करण्याची आमची मागणी आहे. खोट्या आरोपाखाली जोधपूर तुरुंगात ठेवलेले ८६ वर्षीय संत आसारामजी बापू यांची प्रकृती अत्यंत नाजूक आहे.




तुरुंगात जाण्यापूर्वी वयाच्या ७४ व्या वर्षी बापूजींना केवळ ट्रायजेमिनल न्युराल्जिया आणि पाठदुखीचा त्रास होत होता, अत्यंत व्यस्त जीवनशैली असूनही, ११.५ वर्षांहून अधिक काळ सतत कोठडीच्या तणावपूर्ण वातावरणामुळे, आता वयाच्या ८६ व्या वर्षी, त्याला हृदयविकार, प्रोस्टेटच्या समस्या आहेत. →पान १० वर

## पालिका अधिकाऱ्यांचा धारावीच्या विकासाला रोडा, सहाय्यक पालिका आयुक्त अंबी यांचा हुकूमशाही फतवा ..!

### बेकायदेशीर बांधकामाला नोटीसा देऊ नका ,वसाहत विभागाला तोंडी आदेश, इमारत विभागाचे अनधिकृत बांधकामाला संरक्षण

**धारावी :** आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून गणल्या जाणाऱ्या पुनर्विकासाची घोषणा मागील २५ वर्षापासून सुरूच आहे. पुनर्वसनाचा अजून पायाही रचला गेला नाही. त्यापूर्वीच धारावीत रोज झोपड्याच्या जागेवर एकावर एक अनाधिकृत मजले चढवले जात आहेत. या अनधिकृत बांधकामामुळ धारावी पुनर्वसन प्रकल्प आता लटकणार असल्याचे चित्र दिसत आहे. धारावीतील प्रत्येक विभागात काम करणारे कॉन्ट्रॅक्टर कडे महापालिकेच्या ‘जी’ उत्तर विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.असा गंभीर आरोप विश्वात्मक सामाजिक सेवा ट्रस्ट आणि सामाजिक कार्यकर्ते करीत आहे.या संदर्भात धारावीतील अनाधिक बांधकामाच्या मुद्द्यावर धारावी सहा मुंबईतील अनाधिकृत बांधकाम थांबविले


अजीत कुमार अंबी
सहाय्यक पालिका आयुक्त ‘जे’ उत्तर


प्रशांत सकपाळे
पालिका उपायुक्त परिमंडळ २,


राजेश राठोड
सहाय्यक अभियंता

जावे म्हणून सदर ट्रस्टमार्फत लोकांमध्ये सातत्याने जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. →पान ५ वर

● (इमारत विभागाचे सहाय्यक अभियंता राजेश राठोड, नितीन साबळे सहाय्यक अभियंता प्रवीण वेसावे अभियंता सागर अडसूळ, मस्के सहाय्यक पालिका उपायुक्त परिमंडळ दोन प्रशांत सकपाळे, भ्रष्ट मुकादम, इंजिनियर यांच्या मालमत्तेची चौकशी करुन कारवाईची मागणी) ●

## शरद पवार आणि अजित पवार गट बाहेर वेगळे, पण आतून सगळे एकच; राज ठाकरेंचा मोठा दावा



**मुंबई :** राज ठाकरे यांनी शरद पवार आणि राष्ट्रवादी पक्षावरही टी केली आहे. यावेळी त्यांनी म्हटलं की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष नाही. निवडून येणाऱ्या माणसाची मोळी आहे. शरद पवार हेच करत आलेत. ते वेगळे झाले तरी निवडून येणार, असंही राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.मनसेच्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज ठाकरे यांनी नाशिकमध्ये जनसंबोधन केलं. या भाषणात राज ठाकरेंनी सर्वच राजकीय पक्षांवर जोरदार निशाणा साधला आहे. बाहेर वेगळे, पण आतून सगळे एकच- राज ठाकरे यांनी म्हटलं की, राष्ट्रवादीचे काही कार्यकर्ते भेटण्यासाठी आले होते. →पान १० वर


# संपादकीय

## सागरी सुरक्षेसाठी

भारत 'मिलन २०२४' हा उपक्रम या बहुपक्षीय नौदल सरावाचे यजमानपदासाठी तयारी करत आहे जो आंतरराष्ट्रीय सागरी सहकार्याचे प्रतीक आहे. १९९५ मध्ये स्थापन झाल्यापासून, 'मिलन' हा भारताच्या सागरी पराक्रमाचे आणि जागतिक सुरक्षेसाठी वचनबद्धतेचे प्रदर्शन करणारा एक प्रमुख कार्यक्रम म्हणून विकसित झाला आहे. अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया आणि फ्रान्स यांसारख्या नौदल शक्तींसह ५० हून अधिक राष्ट्रांचा समावेश असलेला 'मिलन २०२४' सध्याच्या सागरी आव्हानांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करेल. लाल समुद्र, एडनचे आखात आणि अरबी समुद्र यांसारख्या महत्त्वाच्या जलमार्गांवर हौथी बंडखोर आणि सोाली चाच्यांनी केलेल्या हल्ल्यांनी राष्ट्रां ध्ये अधिक सहकायार्ची गरज अधोरेखित केली आहे. सागरी सुरक्षितते ध्ये भारत एक विश्वासार्ह सुरक्षा भागीदार आणि सागरी स्थिरतेचा पुरस्कर्ता म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत आहे. हिंद महासागर क्षेत्रा- मध्ये भारतीय नौदलाची संलग्नता एक प्रमुख शक्ती म्हणून उदयास येते. २०२२ मध्ये, नौदल बहरीन-आधारित संयुक्त सागरी दलात सामील झाले, यूएस-नेतृत्वाखालील बहुराष्ट्रीय नौदल भागीदारी ज्याचा उद्देश हिंद महासागर क्षेत्रामधील आंतरराष्ट्रीय समुद्रात स्थिरता वाढवणे हा आहे. अलीकडेच, भारताने या गटाचे पूर्ण सदस्य होण्याचा निर्णय घेतला. भारताने या क्षेत्रातील देशांना क्षमता-निर्माण सहाय्य, प्लॅटफॉ 'आणि प्रशिक्षण देखील प्रदान केले आहे, अशा प्रकारे त्यांना त्यांची सागरी क्षमता वाढविण्यात मदत केली आहे. मॉरिशस, सेशेल्स आणि श्रीलंका यांसारख्या राष्ट्रांना सागरी गस्ती जहाजे आणि जलद-हाण करणारी विमाने यांसारखी नौदल मालमत्ता भेट देणे हे सहयोगी सागरी प्रशासनात भारताचे योगदान अधोरेखित करते.

विशेष म्हणजे भारत हिंद महासागरात करत असलेली जलवैज्ञानिक सर्वेक्षणे आणि संयुक्त विशेष आर्थिक क्षेत्र निगराणी त्याच्या पर्यावरणीय कारभाराचे प्रतिबिंबित करतात. 'मिलन' हा उपक्रम सहभागीं ध्ये व्रिकास वाढवण्यासाठी आणि नौदल कार्यवाहीमध्ये परस्पर कार्यक्षमता वाढवण्यासाठी एक व्यासपीठ म्हणूनही काम करतो. नियमांवर आधारित सागरी आदेशाला चालना देऊन, भारत जागतिक स्थिरता आणि समृद्धीसाठी अत्यावश्यक असलेल्या समुद्रांवर सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. हे एक महत्त्वाचे पाऊल आपल्या केंद्र सरकारने उचललेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी सुरक्षेला अत्याधिक महत्त्व दिले होते, परंतु मागच्या काही वर्षांपासून आपल्या देशा- मध्ये या सुरक्षेकडे दुर्लक्ष झाले आहे. याचाच परिणाम म्हणून काही वर्षांपूर्वी ताज हॉटेलवर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता आणि ते मुंबईतच सागरी मार्गानेच आले होते. त्यानंतरही फारसे बदल झाले नाहीत, परंतु आता मात्र त्या दृष्टीने पावले उचलले जात आहेत. सागरी सुरक्षा ही केवळ एका भारत देशाची समस्या नसून सागरी किनारा असलेल्या सर्व देशांची आहे, कारण दहशतवादाची समस्या ही सगळ्याच देशांना कमी अधिक प्रमाणा- मध्ये भेडसावत आहे. दहशतवादाचे माहेरघर असलेल्या पाकिस्तानला सुद्धा याचे चटके भोगावे लागत आहेत, परंतु त्यांना आणखीन अक्कल आलेली नाही हे त्या देशाचे दुर्दैव आहे. पण आपण आपल्या देशाची तरी सुरक्षा करणे हे आपले परमकर्तव्य आहे ते ह्या उपक्रमातून प्राप्त होण्यास मदत होणार आहे. ■■■

## महाराष्ट्राला संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र बनवणारा 'डिफेन्स एक्स्पो'




एक वेळ अशी होती की, अमेरिकेच्या दबावापुढे झुकलेल्या रशियाने भारताला क्रायोजेनिक इंजिन प्रणाली देण्यास नकार दिला. प्रक्षेपण यानामध्ये असणारे हे इंजिन म्हणजे अतिवजनाच्या उपग्रहांना अंतरिक्षात पोहचवणारी अश्वशक्ती क्षमता आहे. आपल्या पीएसएलव्ही म्हणजेच भूउपग्रह प्रक्षेपण यानाचे यश याच इंजिनावर अवलंबून आहे. रशियाच्या नकारानंतर आपल्या वैज्ञानिकांनी दूरदृष्टी दाखवत स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून काही वर्षातच क्रायोजेनिक इंजिन तयार केले. तेव्हापासून भारतीय वैज्ञानिकांनी इतर देशांसमोर हात पसरण्यापेक्षा वेळोवेळी आव्हाने स्वीकारत देशी बनावटीचे तंत्रज्ञान विकसित करत अंतराळ संशोधनात आज पहिल्या पाच देशांमध्ये आपले स्थान पक्के केले आहे.

हीच स्थिती संरक्षण शस्त्रास्त्रे व साहित्य खरेदीबाबतही होती. अमेरिका शस्त्रास्त्रे निर्मिती करण्यात आणि विकण्यातही अग्रेसर आहे. याचप्रमाणे, रशिया, फ्रांस, इस्त्राईल, उत्तर व दक्षिण कोरिया हे देशही यात आघाडीवर आहेत. पण आज भारत अनेक शस्त्रास्त्रे स्वदेशी बनावटीची वापरतो. स्वदेशी तंत्रज्ञान ही संकल्पना संरक्षण क्षेत्रात आणल्यानंतर मोठ्या प्रमाणात संरक्षण उत्पादने तयार करणा-या एमएसएमई देशात तयार झाल्या आहेत. आज देशात मोठ्या प्रमाणात संरक्षण साहित्य निर्माण होत आहे. यात महाराष्ट्र आघाडीवर असून राज्यात १० ऑर्डनन्स फॅक्टरी आणि ५ डिफेन्स पी एस यू आहेत. टाटा, भारत फोर्ज, सोलार, एल अण्ड टी, महिंद्रा, निबे अशा मोठ्या कंपन्या राज्यात संरक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपादने तयार करीत आहेत.

भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीला आणखी बळकटी देण्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत महाराष्ट्रातील संरक्षण साहित्य उत्पादन करणा-या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने २४ ते २६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे' आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील मोशी येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे हा एक्स्पो होत आहे. विशेष म्हणजे संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) सक्षम करणारा महाराष्ट्रातील या प्रकारातील हा पहिलाच डिफेन्स एक्स्पो आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्राविण्य असणाऱ्या उद्योगातील समन्वयाला चालना देण्याच्या उद्देशाने वायुसेना, नौसेना आणि स्थलसेना या तीनही सुरक्षा दलांचा यात महत्वाचा सहभाग असणार आहे. या एक्स्पोमध्ये १ हजारहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, स्टार्ट-अप आणि २०,००० हुन अधिक अभियांत्रिकी विद्यार्थी एकत्र येऊन ज्ञान आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करतील. यात एल अण्ड टी, महिंद्रा, टाटा, डीआरडीओ आणि संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या -पीएसयु (PSUs) यासह विविध प्रतिष्ठित उद्योगातील तज्ज्ञ असतील. हा एक्स्पो महाराष्ट्राला संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून निश्चितच पुढे नेणारा ठरणार आहे.

**भारताच्या संरक्षण क्षेत्रात महाराष्ट्राची भूमिका**

भारताच्या संरक्षण क्षेत्रात महाराष्ट्राची भूमिका अतिशय महत्वाची आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे देशाच्या ४० पैकी १० संरक्षण उत्पादन आणि आयुध निर्माण करणारे कारखाने महाराष्ट्रात आहेत. राज्याची राजधानी - मुंबई, ही भारतीय नौदलाच्या पश्चिम कमांडचे मुख्यालय आहे. भारतीय नौदलाचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमी असलेले पुणे, भारतीय लष्कराच्या दक्षिणी कमांडचे मुख्यालय आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचेही (NDA) मुख्यालय आणि सरंक्षण संशोधन आणि विकास संस्था (DRDO) सुद्धा याच जिल्ह्यात महत्त्वाची भूमिका बजावते. पुण्याचे महत्त्व अधोरेखित करणारे सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालय आणि मुनिशन इंडिया लिमिटेडचे मुख्यालय सुद्धा पुण्यात आहे. भारतीय लष्कराचे आर्मर्ड कॉर्प्स स्कूल आणि सेंटर (ACS&C) हे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात पुण्यापासून सुमारे १२० किलोमीटर अंतरावर आहे. लष्कराशी संबंधित एवढ्या मोठ्या यंत्रणा एकाच राज्यात असणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

**एक्स्पोची मुख्य उद्दिष्टे**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) डिफेन्स एक्स्पो हे एक अभूतपूर्व प्रदर्शन असणार आहे. या क्षेत्रातील नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासोबतच संरक्षण क्षेत्रातील प्रमुख खरेदीदार म्हणजे तीनही सैन्य दल आणि विक्रेता यांच्यातील संपर्क वाढवणे, महाराष्ट्रातील डिफेन्स एमएसएमईची तयार झालेली इकोसिस्टम अधिक बळकट करण्यासोबतच संरक्षण क्षेत्रातील खरेदीदारांसाठी अर्थपूर्ण संवाद निर्माण करणे, यासोबतच व्यवसायाच्या परस्पर फायदेशीर संधी ओळखण्यासाठी 'डायनॅमिक फोरमची' स्थापना करणे, संरक्षण उत्पादन क्षेत्रात नावीन्यपूर्ण उद्योजकतेची संस्कृती जोपासणे, अत्याधुनिक उपायांच्या विकासास प्रेरणा व प्रोत्साहन देणे, धोरणात्मक उपक्रम राबवून शाश्वत आणि मजबूत वाढीसाठी आवश्यक सहाय्य प्रदान करून महाराष्ट्रातील एमएसएमई क्षेत्राच्या विस्तारासाठी सक्रियपणे योगदान देणे, महत्त्वाच्या क्षेत्रातील एमएसएमईसाठी अनुकूल संधी निर्माण करून खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील संपर्क मजबूत करणे हे या एक्स्पोमागील महत्त्वाचे उद्देश आहेत.

तसेच महाराष्ट्रात डायनॅमिक एमएसएमई जाळ्यासाठी एक मजबूत आणि टिकाऊ पुरवठा साखळी फाउंडेशनची स्थापना करणे, संरक्षण उत्पादन आणि निर्यातीसाठी मार्ग मोकळा करणे, शैक्षणिक-उद्योग सहकार्याच्या प्रगतीद्वारे राज्य आणि राष्ट्रासाठी एक शक्तिशाली परिसंस्था उत्प्रेरित करणे हा सुद्धा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

**मनीषा सावळे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई-३२.** ■■■

## मोठ्या प्रमाणात रोजगार देणाऱ्या क्षेत्राकडे सजगतेने बघण्यासाठी

खादी हे आपले महावस्त्र आहे. ज्याने स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशाला एकत्र बांधले आणि प्रत्येक नागरिकाच्या मनात स्वदेशीचा स्वाभिमान जागवण्याचे काम केले. या एका धाग्याने संपूर्ण देशाला एकत्र आणण्याचे काम केले होते. खादीच्या धाग्यात एक शक्ती आहे. त्यामुळेच सर्व विभागांना एकत्र करुन खादीच्या कपड्यांचे महत्व आणि इतरही आपली सुंदर वस्त्र परंपरा आहेत याचे प्रदर्शन भरवण्यात येत आहे. आजकाल नागरिक मॉलमध्ये जाऊन खरेदी करतात. तिथे मोठमोठ्या जाहिराती केलेल्या असतात. ५० टक्के सूट, एकावर एक मोफत असे विविध पद्धतीने ग्राहकांना आकर्षित केले जाते. कोणीही कोणतीही वस्तू अशी मोफत देत नाही. त्याची छुपी किंमत कशात तरी दडलेली असते. पण जाहिराती पाहून आपण आकृष्ट होतो.

आमचा विभाग लघु उद्योजकांसाठी काम करतो. माझ्या विभागासोबत महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, एक जिल्हा एक उत्पादन , उद्योग संचालनालय, भारतीय लघु उद्योग विकास बॅंक, जी लघु उद्योजकांना कर्ज देते आदिवासी विकास विभाग आणि खादी व ग्रामोद्योग आयोग या सर्वांच्या सहकायार्ने १६ ते २५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान



वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथील एम एम आर डीए च्या मैदानावर 'महाखादी कला- सृष्टी २०२४' एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ खादीला प्रोत्साहन देतेच पण खादी ग्रामोद्योग आयोग सुद्धा लघु उद्योजकांना प्रोत्साहन देण्याचे काम करीत असते. आमचा उद्देशच लघु उद्योजकांना प्रोत्साहन देणे हा आहे.

मोठ्या उद्योजकांना, त्यांच्या वस्तूंना सहज बाजारपेठ उपलब्ध होते. ते सहज ऑनलाइन मार्केटमध्ये सुद्धा समाविष्ट होतात. लघु उद्योजकांना मात्र हे सहज शक्य होत नाही. टेक्नोसॅव्ही म्हणजे ऑनलाईन विक्री प्रक्रिया वस्तुचे विशिष्ट प्रकारचा फोटो, विशिष्ट प्रकारचे पॅकिंग, मार्केटपर्यंत पोहचण्यासाठी बरेच प्रयत्न करायला लागतात. त्यामुळे लघु उद्योजकांना बाजारपेठ मिळवुन देणे फार महत्वाचे आहे. लघु उद्योजकांनी निर्माण केलेल्या फार अप्रतिम वस्तु आपल्याकडे आहेत ज्याला खऱ्या अर्थाने लोकांपर्यंत आपण पोहचवले पाहिजे. त्यासाठी वेगवेगळे प्लॅटफॉर्म आपण लोकांना दिले तर त्यांचा उद्योग वाढीस लागू शकतो.

लघु उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याची गरज आहे, म्हणून महाखादी कलासृष्टी प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. तसेच 'एक जिल्हा एक उत्पादन' ही उद्योग संचालनालयाची अतिशय महत्वाकांक्षी योजना आहे. ज्यात प्रत्येक जिल्ह्याचे वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने आहेत. जसे छत्रपती संभाजीनगर मधील पैठणी, हिमरू शॉल,पालघरची वारली, नागपूरची संत्री, कोल्हापूरचा गुळ, चप्पल, लासलगावचे कांदे, कोकणाचे काजू, नाशिकचे द्राक्षे, महाबळेश्वरचे मध आहे, अशी वैविध्यपूर्ण वस्तूंनी सजलेली वैशिष्ट्यपूर्ण बास्केट महाखादी कलासृष्टी प्रदर्शनामध्ये असणार आहे. सुंदर अशा कपड्यांसोबतच हस्तकलेच्या वस्तू व खाद्यपदार्थ आहेत. ■■■

## मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम यांनी स्वीकारला पदाचा कार्यभार



**मुंबई** : महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी या पदावर भारत निवडणूक आयोगाने भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी एस. चोकलिंगम यांची नियुक्ती केली. त्यानुसार दि. ५ मार्च २०२४ रोजी चोकलिंगम यांनी प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र, मंत्रालय, मुंबई या पदाचा कार्यभार विद्यमान मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्याकडून स्वीकारला.

निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार, नियुक्त महाराष्ट्र केडरचे आय.ए.एस अधिकारी एस. चोकलिंगम पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमीचे महासंचालक म्हणून कार्यरत होते.

## लोकसभा निवडणूक -२०२४ आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी जबाबदारीने कामे पार पाडावीत-जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ



**मुंबई** : आगामी लोकसभेच्या निवडणुका जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू होणार असून शासकीय कार्यालयाच्या प्रमुखांनी आपल्या अधिनस्त मालमत्तेवरील पोस्टर्स, बॅनर, झेंडे, रंगविलेला मजकूर, होर्डिंग वेळेत काढून घेण्याचे नियोजन करावे तसेच आचार संहितेच्या पार्श्वभूमीवर आणि निवडणुकीच्या अनुषंगाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी जबाबदारीने कामे पार पाडावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले.

लोकसभा निवडणूक-२०२४ च्या पार्श्वभूमीवर क्षेत्रिय अधिकाऱ्यांची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शशिकांत हदगल आदींसह सर्व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, जालना लोकसभा मतदार संघातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी आपल्या कामात सजग राहण्याबरोबरच प्रशिक्षण, माहिती देणे, आचारसंहितेचे पालन होते की नाही ते पाहणे आदी कामे चोखपणे पार पाडावीत.

आचारसंहिता पथक, मतदान कर्मचारी व्यवस्थापन कक्ष, प्रशिक्षण पथक, निवडणूक साहित्य पथक, वाहतुक व्यवस्था पथक, आयटी सेल पथक, स्वीप पथक, कायदा व सुव्यवस्था पथक, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट पथक, निवडणूक खर्च पथक, बॅलेट व पोस्टर बॅलेट पेपर पथक, मिडीया कक्ष पथक, संवाद पथक, मतदार यादी कक्ष पथक, तक्रार निवारण कक्ष, निवडणूक निरीक्षक पथक, सुविधा पथक, मतमोजणी पथक, ओळखपत्र निर्गमित पथक, वेबकास्टींग कंट्रोल रुम पथक, मानधन कक्ष पथक, आदेश वितरण पथक, परवानगी कक्ष पथक, अवैध दारु वाटपास प्रतिबंध पथक आदींचा त्यांनी सविस्तर आढावा घेत विविध सूचना केल्या. यावेळी स्वीपच्या लोगोचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

## महाशिवरात्रीनिमित्त सनातन संस्थेच्या वतीने ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून अध्यात्मप्रसार !

**मुंबई** – 'महाशिवरात्री'ला शिवतत्त्व नेहमीच्या तुलनेत १ हजार पटीने कार्यरत असते. या दिवशी शिवाची उपासना जेवढी अधिक करू, तेवढा उपासकाला आध्यात्मिक स्तरावर अधिक लाभ होतो. या अनुषंगाने शिवाच्या उपासनेसह विविध विषयांवर भाविकांना शास्त्रीय माहिती मिळावी, यासाठी सनातन संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून अध्यात्मप्रसार करण्यात आला. मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांत महाशिवरात्रीच्या निमित्ताने भगवान शंकराच्या मंदिराच्या परिसरात सनातन संस्थेच्या वतीने १३६ ठिकाणी ग्रंथप्रदर्शने लावण्यात आली होती. या सर्व ग्रंथप्रदर्शनांना हजारो जिज्ञासूंनी भेट देऊन सनातनचे विविधांगी ग्रंथ आणि सनातनची सात्त्विक उत्पादने घेतली.



मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांतील हजारो जिज्ञासूंनी दिली सनातनच्या ग्रंथप्रदर्शनांना दिली भेट !

या सर्व ग्रंथप्रदर्शनांना भेट देणारे विविध मान्यवर जिज्ञासू आणि भाविक यांनी सनातन संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेले अध्यात्म, साधना, देवतांची उपासना, धर्माचरण, राष्ट्ररक्षण, धर्मजागृती, आपत्काळविषयीची सिद्धता आयुर्वेद, आरोग्य आदी विषयांवरील ग्रंथमालिकेतील ग्रंथ आणि सात्त्विक उत्पादने घेतली. चेंबूर येथील श्री भूलिंगेश्वर मंदिरातील ग्रंथप्रदर्शनाला आमदार प्रकाश फातर्पेकर यांनी भेट दिली. 'ग्रंथांच्या माध्यमातून भारतीय संस्कृती सर्वांपर्यंत पोचवण्याचे महत्कार्य सनातन संस्था करत आहे', असे आमदार प्रकाश फातर्पेकर यावेळी म्हणाले. तर वरळी येथील सनातनच्या ग्रंथपदर्शनाला आमदार सुनील शिंदे यांनी भेट दिली. सनातनच्या अनेक ग्रंथपदर्शनांवर यावेळी अनेक जिज्ञासूंनी साधना, वास्तूशुद्धी आदी विषयांवर शंकानिरसनही करुन घेतले, तसेच दैनंदिन जीवनात धर्माचरण आणि साधनेसाठी करावयाचे प्रयत्न आणि कृती सुद्धा काही जिज्ञासूंनी समजून घेतल्या.

## धारावीत शिधावाटप केंद्र सील, दोघांवर गुन्हा दाखल



**धारावी** : शिधावाटप अधिकाऱ्यांनी अन्नसुरक्षा धान्याचा एकत्रित अपहार प्रकरणी धारावी संगमगल्ली येथील शिधावाटप दुकान क्रमांक १७ - अ - १३२ वर छापा टाकून दुकानाला सील ठोकल्याची घटना मंगळवारी घडली आहे. या छाप्यात शिधावाटप अधिकाऱ्याने अन्नसुरक्षा तांदूळ, गहू, आनंदाचा शिधा संच एकूण ९७ हजार ६०९ रुपयाचा मुद्देमाल जप्त करून दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी शिधावाटप दुकानाचे मालक प्रभावती रामलिंगम नाडार आणि चालक रोहित गुप्ता यांच्यावर अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ कलम ३,७,८ अन्वये गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यापासून धारावी संगमगल्ली परिसरातील सदर दुकानात अन्न सुरक्षा धान्याचा काळाबाजार केला जातो अशी गोपनीय माहिती शिधावाटप निरीक्षक सुधीर गव्हाणे व विवेक त्रिभुवन यांना मिळाली. माहिती मिळताच अधिकाऱ्यांनी दुकानातील धान्याच्या साठ्याबाबत चौकशी करताच दुकानातील धान्याचे वाटप न करता धान्याची विक्री काळ्याबाजारात करत असल्याचे उघड झाले. लागलीच उपस्थित अधिकाऱ्यांनी धारावी पोलीस आणि दोन पंचांना बोलावून शेकडो किलोचा धान्यसाठा जप्त करून शिधावाटप केंद्राला सील ठोकले. संगमगल्लीतील धान्याचे दुकान सील झाल्याची बातमी परिसरात वाऱ्यासारखी पसरली. शिवसेना (उबाठा) शाखाप्रमुख कक्ष विधानसभा संघटक किरण काळे म्हणाले शिधावाटप अधिकाऱ्यांनी धारावीतील सर्वच शिधावाटप

दुकानातील धान्याच्या वितरण व साठ्या बाबत चौकशी केलीतर मोठा भ्रष्टाचार उघड होऊन अनेक काळाबाजारी गजाआड जातील धारावीतील अनेक दुकानात शिधाधारकांना अन्नसुरक्षा धान्याचे वाटप न करता दुकानदार त्यांच्या हिस्स्यांचे धान्य काळाबाजारात खुलेआम विकत आहेत. या दुकानदारांनी काही भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरून आपला गोरखधंदा सुरु ठेवल्याचा आरोप त्यांनी केला.

## अल्पवयीन मुलाचे अपहरण करून हत्या,आरोपी अध्यापही फरार



दुर्दैवी संदीप



संशयित विपुल

**धारावी** : वडाळा शांतीनगर झोपडपट्टीतील संदीप बेचई यादव वय १३ वर्षे या मुलाचे अपहरण करून त्याचा खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. शेजारी राहणाऱ्या निर्दयी विपुल शिकारी नावाच्या बंगाल्याने हा खून केल्याचा आरोप संदीपचे वडील बेचई यादव यांनी केला. आरोपीने मुलाची ओळख पटू नये म्हणून त्याचे शीर धडावेगळे करून धड शिवडी बीपीटी टोलनाक्यालगत असलेल्या खाडीत फेकले तर शीर (मुंडके ) धडापासून ५० मीटर अंतरावर असलेल्या शिवडी खारफुटीत फेकून दिले होते. संदीपचे वडील म्हणाले, जानेवारी रोजी रात्री ९ च्या सुमारास माझा मुलगा आई सोबत घरात असताना शेजारी राहणाऱ्या विपुल शिकारीने त्याला काही कामानिमित्त घराबाहेर बोलावून घेतले. बराचवेळ झाला तरी तो परतला नाही. विपुलच्या घरी विचारणा केली असता विपुल उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला व लगेच फरार झाला.

## धारावी पंचरत्न महापुरुष मंचातर्फे संत कक्कया महाराज जयंती संपन्न



**धारावी** :धारावी बहुभाषिक आणि चर्मकार बांधवांची मोठी वस्ती आहे. या वस्तीला संत पारंपारिक इतिहास आहे. अशा एका संत कक्कया महाराज यांच्या जयंतीनिमित्त ८ मार्च २०२४ रोजी सकाळी स्थानिक लोकांच्या सहकार्याने महाराजांच्या प्रतिमेला ज्येष्ठांच्या हातून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी दिलीप गाडेकर गिरीराज शेरखाने यांनी कार्यक्रमाची संक्षिप्त माहिती देण्यात आली सामाजिक रित्या सर्व उपस्थित त्यांनी हात जोडून प्रार्थना केली. कार्यक्रमाचे शेवटी राजगिरा लाडू केळी या प्रसादाचे वाटप महेंद्र हटकर शंकर गोपी रे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. विशेषता या विभागातील महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिक संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सविता शेरखाने,विजया शिंदे,किसन नारायणे, चंद्रकांत जाधव यांचे सहकार्य लाभले.

## थोडक्यात

### अरुणोदय वॉकर्स असोसिएशन यांच्या वतीने महिलांचा सन्मान



**मुंबई :** ८ मार्च महिला दिना निमित्त अरुणोदय वॉकर्स असोसिएशन यांच्या वतीने नियमित व्यायामा बरोबर समाजातील कतृत्ववान महिलांचा एमायजी क्लब ग्राउंड बांद्रा या ठिकाणी सत्कार करण्यात आला.

ठाणे येथे क्रीडा अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या प्रसिद्ध कबड्डीपटू सायली उर्मिला उदय जाधव आणि खेर नगरच्या एकमेव महिला रिक्षा चालक सौ. अलका जाधव यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे महिलांमध्ये चांगला संदेश दिला आहे. हा संदेश सर्वदूर पोहचावा या हेतूने दोघींना संस्थेमार्फत संस्थेचे सचिव श्री. किरण भोगले, सहसचिव दिलीप गाडेकर यांच्या हस्ते पुष्प व पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले.त्या दोघींनी त्यांच्या आजवरच्या वाटचालीतील अनुभव सांगून उपस्थित सभासदांशी संवाद साधला. यावेळी शिल्पा शिरोळे, शैलेजा सोमानी, सुनंदा भोगले,भारती पोळ, हरीश भाई व ज्येष्ठ लेखक अरविंद रिसबूड, संध्या सातारकर, प्रकाश निमकर आणि इतर अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती.कार्यक्रमाचे शेवटी उपस्थित सर्व महिलांना गोड खाऊ वाटून शुभेच्छा देऊन कार्यक्रम संपन्न झाला.

### 'महात्मा बसवेश्वर सामाजिक समता- शिवा पुरस्कार' २०२३-२४ साठी अर्ज करण्याचे आवाहन

**नवी मुंबई :** कोंकण विभागातील इतर मागास बहुजन कल्याण विभाग प्रादेशिक उपसंचालक यांच्याकडून एक व्यक्ती व एक संस्था यांना महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज करण्याचे आवाहन प्रादेशिक उपसंचालक वंदना कोचुरे यांनी केले आहे.महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत वीरशैव लिंगायत समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक, समाजप्रबोधन व साहित्यिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कलावंत, साहित्यिक, समाज प्रबोधनकार आणि समाज सेवकांना तसेच सदर समाजकार्यसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना प्रतिवर्षी अक्षय तृतीया या दिवशी एक व्यक्ती व एक संस्था यांना 'महात्मा बसवेश्वर सामाजिक समता- शिवा पुरस्कार' देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.हा पुरस्कार अक्षय तृतीय मुहूर्तावर मे-२०२४ मध्ये देण्याचा प्रस्तावित आहे. तरी या पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याकरिता वीरशैव लिंगायत समाजातील इच्छुक असलेल्या व्यक्ती व त्या समाजाच्या उत्थानासाठी कार्य करणाऱ्या संस्था यांच्याकडे रितसर अर्ज मुंबई विभागाच्या मुंबई शहर, उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयाच्या सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण या कार्यालयाकडून मागविण्यात येत आहेत.

### जे.जे. रुग्णालयात उभारणार आणखी दोन कॅथलॅब

**मुंबई :** महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना अत्यल्प दरात अँजिओप्लास्टीची सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता जे.जे. रुग्णालयातील कॅथलॅबचे नुकतेच अद्ययावतीकरण करण्यात आले. मात्र अधिकाधिक नागरिकांना अद्ययावत सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी जे.जे. रुग्णालयामध्ये या वर्षात आणखी दोन कॅथलॅब उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे हृदयविकार असलेल्या रुग्णांना दिलासा मिळू शकेल.

मुंबईतील सर्वाधिक अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया जे.जे. रुग्णालयात करण्यात येतात. मात्र मागील काही दिवसांपासून जे.जे. रुग्णालयाच्या कॅथलॅबमधील दोनपैकी एक यंत्र बंद होते. राज्य सरकारने नुकतेच या केंद्राचे अद्ययवतीकरण केले. या केंद्रात एक नवीन यंत्र आणण्यात आले.

## रेशन दुकानांमध्ये फोर-जी ई-पॉस मशिन व IRIS स्कॅनची सोय

**मुंबई :** रेशन दुकानांमध्ये आता ४-जी ई-पॉस मशिन व IRIS स्कॅनची सोय करण्याचा निर्णय अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने घेतला आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना याचा फायदा होणार असून त्यामुळे नागरिकांना प्रतिक्षा करावी लागणार नाही.



राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम या योजनेतील अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन धान्याचा होणारा अपहार/गैरव्यवहार थांबविण्यासाठी, लाभार्थ्यांना पारदर्शी पद्धतीने धान्याचे वाटप करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आले आहे. लाभार्थ्यांची ई-पॉस मशिनद्वारे बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार रास्तभाव दुकानांमध्ये २जी/३जी ई-पॉस मशिन बसविण्यात आल्या होत्या. सदर सेवा देणाऱ्या संस्थाचा कालावधी संपुष्टात आल्याने रास्तभाव दुकानांमध्ये नविन ई-पॉस मशिन बसविण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुसार ओऍसिस विजनटेक आणि इऑग्रा या तीन ३ सिस्टम इंटीग्रेटर संस्थांची नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवून निवड करण्यात आली आहे. रास्तभाव दुकानांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणारे नविन ई-पॉस मशिन ४जी व आयरीस स्कॅनर या तंत्रज्ञानासह उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आधारकार्ड वरील फिंगरप्रिंट्स उपलब्ध नसल्यास आधार पडताळणी करताना अनेक अडचणी येतात. अशा व्यक्तींची आधार पडताळणी कशी करावी? हा मोठा प्रश्न यानिमित्ताने मार्गी लागला आहे. शिधापत्रिकेमध्ये आधार संलग्न पात्र असलेली पण फिंगरप्रिंट देता येत नसलेल्या व्यक्तींना 'IRIS स्कॅनर वापरून पडताळणी करता येणार आहे. त्यामुळे आता आधार संलग्न हाताचे ठसे येण्यास अडचण असल्यास डोळ्यांचे स्कॅन केले जाणार आहे. सदर प्रक्रीयेमुळे रेशन धान्य वितरण प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता व सुलभता निर्माण होणार आहे.

## माहीम रेल्वे भूखंडावरील १५५ गाळेधारकांना कारवाईची नोटीस




**धारावी :** माहीम स्क्रॅप यार्डातील एका मंदिरासह १५५ गाळ्यांवर तोडक कारवाईची टांगती तलवार लटकत असून लवकरात लवकर ती सर्व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात यावीत असे आदेश न्यायालयाने रेल्वे अधिकाऱ्यांना दिले आहेत. संबंधित अधिकाऱ्याने हि कारवाई करण्यास नकार दिल्यास किंवा अयशस्वी झाल्यास त्यांना सर्वस्वी जबाबदार धरून का बेदखल करण्यात येऊ नये असे सुनावले आहे. यामुळे गेल्या काही दिवसापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी माहीम स्क्रॅप यार्डामधील सर्वच अनधिकृत बांधकामांना तोडक कारवाईचे नोटीस बजावली.

**कारवाईनंतर आपले काय ?**

**कारवाईनंतर आपले काय होईल अशी भीती स्थानिकांना भेडसावत आहे. त्यामुळे परिसरात धारावी पुनर्वसन प्रकल्पाला रेल्वे प्रशासनाने विकलेल्या जमिनीच्या चर्चेला उधाण आले असून पश्चिम रेल्वे प्रशासन सदर जमीन विकासकाला देण्यासाठी मोकळी करत आहे असा दबका आवाज उठत आहे. याच महिन्यात येथील गाळेधारकांचे भवितव्य ठरणार असून संबंधित प्रशासनाची तशी जोरदार तयारी सुरु असल्याची चर्चा परिसरात सुरु आहे.**

नोटीस हाती पडताच शेकडो गाळेधारकांची झोप उडाली स्थानिकांची दुकाने व झोपड्या वाचविण्यासाठी पायपीट सुरु झाली. मात्र कारवाई अटळ असल्याचे समजताच त्यांचा हिरमोड झाला. माहीम स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर व माहीम स्क्रॅप यार्ड परिसरातील मोकळ्या जागेत गेल्या काही वर्षांपूर्वी मंदिरासह अनेक दुकाने व झोपड्या बांधण्या आल्या. झोपड्या व दुकाने बांधताना रहिवाशांनी रेल्वे प्रशासनाकडून कोणतीही परवानगी घेतली नाही. आज या जागेत मंदिर दुकानांसह अनेक झोपड्या उभ्या आहेत. परिसरात सदर जमीन रेल्वेची मालमत्ता असल्याचे समजताच शेकडो गाळेधारकांची पाचावर धारण बसल्याचे दिसत आहे.



जी/उत्तर,प्रभाग क्र १८६(धारावी) घन कचरा व्यवस्था विभागा मार्फत २ अतिरिक्त संस्था, सफाई कर्मचारी यांची संख्या वाढून सुद्धा दुपार, संध्याकाळी पाळीत, गजानन कॉलनी, शास्त्री नगर साईबाबा मंदिरा समोरील कचरा कुंडीतील शून्य कचरा मुक्त का होत नाही? कारणीभूत कोण ? अधिकारी, कर्मचारी की संस्था चालक? यांची सखोल चौकशी करण्यात यावी....

## राज्यातील ५२ नाट्यगृहांचे अद्यतीकरण तर २३ नाट्यगृहांची नव्याने उभारणी करणार!

**मुंबई :** महाराष्ट्राला कला आणि संस्कृतीचा अत्यंत गौरवशाली वारसा लाभला आहे. कला आणि संस्कृतीशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. नाट्य संस्कृतीला अधिक बळकट करण्यासाठी राज्यात ७५ नाट्यगृहे अद्ययावत करण्यात येणार आहेत. यामध्ये ५२ नाट्यगृहांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार असून उर्वरित नाट्यगृहे नव्याने उभारण्यात येणार आहेत. ती सर्व सुविधा संपन्न असावीत व परिपूर्ण असावी यासाठी अकरा तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.महाबळेश्वर येथे दोन हजार प्रेक्षक क्षमतेचे नाट्यगृह असून ते सध्या बंद स्थितीत आहे. हे नाट्यगृह पुन्हा सुरू करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देण्याची सूचनाही त्यांनी केली. मुंबई येथील फिल्म सिटी बाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, ही फिल्म सिटी आंतरराष्ट्रीय दर्जाची करण्यात येणार आहे. मराठी भाषा व नाट्य चळवळ यांना बळ देण्यासाठी शासन नेहमीच सकारात्मक असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.



धारावी पंप हाऊस येथील शंकर मंदिरामध्ये 'जल अभिषेक' करण्यासाठी धारावी विभागातील महिला मंडळातर्फे जल अर्पण करण्यास गेलेले कार्यकर्ते.

# शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना

**मुंबई** : राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय शुक्रवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला.

या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे.



समितीचे निष्कर्ष व शिफारशी विचारात घेऊन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील बाजारामधील चढ-उतार यामध्ये निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे शिफारशीतले तत्व मान्य करुन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तीवेतनाच्या ६०% इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल याबाबतीत राज्य शासनातर्फे यथोचित कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

वयोमानानुसार निवृत्ती स्वीकारावी लागते. त्यामुळं निवृत्तीवेतन हाच अनेकांसाठी जगण्याचा आधार ठरतो. म्हणूनच आम्ही या विषयावर सुरुवातीपासून संवेदनशील राहिलो आहोत. निवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक आयुष्य जगता यावं हे तत्व मान्य केलंय. याविषयावर आम्ही राज्य सरकारी कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या विविध संघटनांशी वारंवार संवाद-संपर्कात होतो, असे मुख्यमंत्री म्हणाले.


ज्या-ज्यावेळी या संघटनांनी या विषयावर चर्चेची, बोलण्याची मागणी केली. त्या-त्यावेळी आम्ही त्यांना वेळ दिला. समितीच्या अहवालावरही बैठका घेण्यात आल्या. मंत्रिमंडळातील सहकारी, कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीशी, तज्ज्ञांशीही चर्चा केली आहे. यात उपमुख्यमंत्री तथा तत्कालिन वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विद्यमान वित्तमंत्री अजित पवार यांनीही सकारात्मक सूचना केल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

पान नं १ वरुन

# पालिका अधिकाऱ्यांचा धारावीच्या विकासाला रोडा, सहाय्यक पालिका आयुक्त अंबी यांचा हुकूमशाही फतवा ..!


मात्र तरीही पालिकेचे भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या साह्याने कॉन्ट्रॅक्टर,घरमालक धारावी दररोज अनाधिकृत बांधकामाचे मजलेच्या मजले रचत आहेत. आरसीसी बांधकामाद्वारे चाळी, इमारती बनण्याचे कामही सुरू आहे. अतिशय निकृष्ट दर्जाच्या पद्धतीच्या या बांधकामामुळे दुर्घटना होण्याची ही शक्यता जास्त आहे. हे सर्व पालिका अधिकाऱ्यांना माहित असूनही अशी बांधकामे सर्रास सुरू असल्याची माहिती स्थानिक रहिवाशांनी दिली.

धारावीतील प्रत्येक प्रभागात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामे वाढली आहेत. या बांधकामांना पालिकेकडून नोटीस बजावणी आले आहेत मात्र पालिकेत असंख्य नोटीस अजूनही धूळ खात पडलेल्या आहेत. यामुळे सदर संबंधित 'जी' उत्तर विभागातील अधिकारी यांना सर्वस्वी जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई करून तात्काळ निलंबित करण्यात यावे. तसेच अनधिकृत बांधकाम करणारे कॉन्ट्रॅक्टर घर मालकावर एमआरटीपी किंवा झोपडपट्टी दादा ॲक्टनुसार कारवाई करून त्यांना अटक करण्यात यावी अशी मागणी सदर संस्थेमार्फत करण्यात आलेली आहे. २ ऑगस्ट २०२३ रोजी आझाद मैदानात अनाधिकृत बांधकामावर कारवाईच्या मागणी करता उपोषण करण्यात आलेले होते.



नितीन साबळे





सदर उपोषणाच्या अनुषंगाने गृह सचिव यांनी भेट देऊन कारवाईचे आश्वासन दिले होते. त्यानुसार जीवे मारण्याच्या धमकी देण्याच्या संदर्भामध्ये ठाकरे गटाचे माजी नगरसेवक टीएम जगदीश यांच्यावर कारवाई करण्यात आली त्यानंतर मात्र अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई करण्यात आलेली नाही. उपोषणाच्या वेळी एका मागणीला न्याय मिळला असून दुसरी मागणी तशीच राहून गेली. या सर्व कारवाईमुळे सध्याचे पालिकाउपायुक्त परिमंडळ-२ प्रशांत सकपाळे हे काही महिण्यापूर्वी सहाय्यक पालिका आयुक्त 'जी' उत्तर विभाग येथे कार्यरत होते. त्यांची बडती झाली दरम्यान सहाय्यक अभियंता राजेश राठोड, नितीन साबळे मुकादम राजू भाई, अभियंता सागर अडसूळ, सहाय्यक अभियंता प्रवीण वेसावे, अभियंता मस्के आणि इतर संबंधित अधिकारी उपोषण केल्याचा राग मनात ठेवून अनाधिकृत बांधकामालावर कारवाई करण्यास तयार होत नाहीत.

याबाबत सदर संबंधित अधिकाऱ्यांना आठवड्याचा सोमवारी आणि शुक्रवारी या दिनी पालिका कार्यालयात दुपारी ३ ते ५ या भेटण्याच्यावेळी भेटण्यास गेले असता, पालिका अधिकारी ज्येष्ठ नागरिकांना,सामाजिक कार्यकत्यांना व तक्रार धारकांना जानिवपूर्व भेटत नाहीत. प्रत्येक वेळी जास्तीत जास्त गैरहजर असतात . याबबात तक्रार करण्यासाठी सहाय्यक पालिका आयुक्त यांना भेटण्यास गेले असता त्यांचे अधिकारी म्हणतात की, तुम्ही फक्त वैयक्तीक तक्रार असेल तरच भेटायचे, स्थानिक किंवा जनहितेच्या तक्रारी असेल तर भेटायचे नाही. असा आदेश पालिका आयुक्तांनी दिला आहे असे कर्मचारी सांगतात.

१५ एप्रिल २०२३ पासून आज पर्यंत सध्याचे पालिका उपायुक्त आणि माजी सहाय्यक आयुक्त प्रशांत सकपाळ यांनी गेल्या १८ महिन्यापासून सतत भेटण्याचे ठाळले आहे. याचे कारण काय? या मागे किती कोटीचा भ्रष्टाचार? असे स्थानिक रहिवाशी व सामाजिक कार्यकर्ते विचारत आहेत.

याचाच सरळ अर्थ असा होतो की, अनधिकृत बांधकामला पालिका अधिकाऱ्यांचेच संमर्थन आहे. त्याच्या मागे लाखो रुपयांची काळी कमाई खाण्याच्या उद्देशाने सर्व गैर कारभार सुरु असल्याची चर्चा पालिका वर्तुळात आहे. म्हणून यांच्यावर कारवाई झाली पाहिले.अशी मागणी स्थानिक रहिवाशी करत आहेत.

या करीता येणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनामध्ये अतिविशाल असा मोर्चा काढून 'भ्रष्ट अधिकारी हटाव, धारावी बचाओ ' असा आंदोलनाचा कार्यक्रम आयोजित करावा लागणार आहे.याबाबात पालिकाउपायुक्त परिमंडळ २ रमाकांत बिराजदार यांची भेट घेवून संबंधित अनधिकृत बांधकामाविरोधी माहिती देण्यात आलेली होती. मात्र त्यांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते आणि राजेश राठोड सहाय्यक अभियंता यांना १० लोकांवर एमआरटीपी लावण्याचा आदेश दिला होता. परंतु त्यांनी गेले आठ महिन्यापासून टाळाटाळ केली आहे आणि अनाधिकृत बांधकामे राजेश राठोड याच्या समर्थनातच वाढलेली आहेत. राजेश राठोड यांची मोठे राजकीय वलय असल्याने गेल्या अनेक वर्षापासून 'जी' उत्तर विभागाच्या सर्वच खात्यामध्ये गेल्या २० वर्षापासून ते काम करत आहेत. पालिका कर्मचारी, अधिकारी यांना एकाच वार्डात जास्तीत जास्त ३ वर्ष सेवा देण्याचा नियम असताना हे अधिकारी एवढे वर्ष ठिकाणी कसे काय ? त्यांच्या या भ्रष्ट कारभारामुळे संपूर्ण धारावीत गेल्या १८ महिण्यापासून अनधिकृत बांधकामावर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्याच्यामध्ये सर्व भ्रष्ट अधिकारी एकत्रित आहे. सदर पालिकाउपायुक्तांत बिराजदार यांनी धारवीतील अनधिकृत बांधकामे करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरवर एमआरटीपी लावण्याचे आदेश सहाय्यक अभियंता राजेश राठोड यांना दिले असताना देखील ते दहा महिणा होवून गेला तरी संबंधित कॉन्ट्रॅक्टर व घरमालक यांना एमआरटीपीच्या नोटीस दिल्या नाहीत.

प्रभाग क्र.१८७ १८८ १८६,१८३,१८५,१८९, मध्ये मोठ्या प्रमाणात आजही अनाधिकृत बांधकामे सुरू झालेली आहेत. एकीकडे धारावी पुनर्वसन प्रकल्प सुरू होणार अशी चर्चा आहे तर दुसरीकडे हेच भ्रष्ट अधिकारी अनधिकृत बांधकामे वाढवण्यासाठी कॉन्ट्रॅक्टरांना आपल्या केबिनमध्ये बसून लाखो रुपयांचा हप्ता घेऊन बांधकाम करण्यास मोकळी देत आहेत. मोकळ्या जागा असो या खुले मैदान या झोपड्यावर झोपडे असे अनधिकृत बांधकामे करण्याची मुबाज या सर्वांनी दिलेली आहे.

गेल्या१८ महिन्यापासून सहाय्यक पालिका आयुक्त आणि सध्याचे पालिका उपायुक्त परिमंडळ दोन प्रशांत सकपाळे आणि सहाय्यक अभियंता राजेश राठोड, सागर अडसूळ, प्रवीण वेसावे, नितीन साबळे, मस्के यांनी अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना संरक्षण दिले असून असंख्य नोटीस पेंडिंग पडलेले आहेत तरी कारवाई केली जात नाही. उलट वेगवेगळ्या फर्मान काढण्यात येत आहेत. हुकूमशाही फर्मान सामाजिक कार्यकर्ते नागरिक यांना भेटण्यास तयार नाहीत.


नवीन आलेले सहाय्यक पालिका आयुक्त अतितकुमार अंबी यांनी सुद्धा आता मुघल शाही तुगलक फर्मान जारी केले आहे .त्यांनी दिलेल्या फतवा असा की 'वसाहत विभागाने आता बेकायदेशीर बांधकामाला नोटीसा द्यायच्या नाहीत. थ्री झेड वन अंतर्गत त्यांनी फक्त स्थळ निरीक्षण अहवाल द्यायचा आहे. विभागाने नोटीसा द्यायच्या नाहीत.कितीही अनाधिकृत बांधकामे वाढले तरी चालतील ग्राउंड प्लस वन च्या बेकायदेशीर बांधकामालाही नोटीसा द्यायच्या नाहीत. तर ग्राउंड प्लस टू सोडाच. मुंबई महानगरपालिकेचा १४ फुटाचा नियम असताना तो मोडण्याचा काम पालिकेचे अधिकारीच करत असल्याचे दिसून येत आहे तर नोटीस देण्याचे अधिकार संपूर्ण इमारत विभागाला देण्यात आल्या असल्याची माहिती मिळत आहे. यामुळे आणखी अनधिकृत बांधकामे वाढण्याची शक्यता आहे.

नवेनियुक्त सहाय्यक पालिका आयुक्त अतितकुमार अंबी यांनीसुध्दा मुगलशशाही व हुकूमशाही फतवा..... जारी केलेला आहे 'की वसाहत विभागा ने अनधिकृत बांधकामाला नोटिसा द्यायच्या नाहीत, १८ महिन्यापासून बेकायदेशीररिते इमारत विभाग अनधिकृत बांधकामावर कारवाई करत नाहीत त्यांनाच आता नोटीस देण्याचे अधिकार दिले असल्याची माहिती सूत्रांकडून कळत आहे यामुळे आता भ्रष्ट अधिकाऱ्यांचे चांगलेच पावलेले आहे येणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशना दरम्यान या सर्व भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या टोळीच्या विरोधात आणि हुकूमशाही जाहीर फतव्याच्या विरोधात धरणे प्रदर्शन करणार असल्याचे धारावीतील सामाजिक कार्यकर्ते आणि वरिष्ठ नागरिक करणार असल्याचे चर्चा आहे यामध्ये सामाजिक संस्था अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देऊन भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या या पाठराख यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून कळते.


## रेल्वेचा सरकारी कर्मचारी करतोय बेकायदेशीर बांधकाम निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे इमारत कोसळण्याची शक्यता

**खाजगी जागेवर, कॉन्ट्रॅक्टर डॅनी कोळी, घरमालक पाटील या दोघांनी भंगारवाल्याचे दुकान चक्कीच्या बाजूला धारावी कोळीवाडा, पाटील निवास समोर, ग्राउंड प्लस थ्री याचे आरसीसी बांधकाम भर रस्त्यातच केले. एक बांधकाम आरसीसी केलेले आहे, तर दुसरे बांधकाम त्याच्याच बाजूला भंगारवाल्याचे दुकानाचे करण्यात आले. दोन दुकानाची पूर्ण इमारत उभी करण्यात आली आहे. आरसीसी बांधकाम करून कोणतीही एनओसी नाही आणि बेकायदेशीररित्या धारावी मेन रोड मुख्य रस्त्यावरील याचा मुख्य नाल्यांमध्ये सदर इमारतीची मुख्य मलवाहक लाईन नाला सोडण्यात आलेला आहे. पाईप लाईन टाकून त्याच्यावर सिमेंट कोबा करण्यात आलेला आहे. याबाबत संबंधित पालिका आयुक्तांपासून सहायक पालिका आयुक्त या सर्वांना पत्र देण्यात आलेले आहे आणि भेटूनही सांगण्यात आले आहे परंतु इमारत तयार कारवाई नाही. सागर अडसूळ यांची भेट घेऊन त्यांना सांगण्यात आले परंतु त्यांनी कारवाई करण्यास असमर्थता दाखवलेली आहे आणि कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहे. बिनधास्तपणे पालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांशी हात मिळविणे करून कोणतेही कायदेशीर नगर विकास इमारत विभाग आणि मुंबई महानगरपालिका सक्षम अधिकारी म्हाडा कार्यालय यांची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. उलट बिनधास्तपणे अनाधिकृत बांधकाम केली जात आहे. स्टॉप वॉटर ड्रेनेज आणि घनकचरा व्यवस्थापन गटार व नाले विभाग यांना माहिती देण्यात आली आहे. याबाबत ट्विटरवर घनकचरा व्यवस्था आणि आणि पर्यावरण विभागाला ट्विटरवर तक्रारी देण्यात आलेल्या आहेत त्यांनी कारवाईचे आश्वासन दिले परंतु अजूनही कारवाई झालेली नाही.**


## शिका चित्रकला




## शोधा बरं वाट!!




## चित्र रंगवा



भटकंती

# नीरव शांततेतील भटकंती

दोस्तांनो, भटकंतीसाठी शांत आणि कमी गर्दीच्या ठिकाणांच्या शोधात असाल तर भारतातली काही ठिकाणं तुम्हाला नक्कीच खुणावतील.

उत्तराखंडमध्ये लँडोर नावाचं ठिकाण आहे. हे ठिकाण मसुरीपासून सहा किलोमीटर अंतरावर आहे. लँडोरमध्ये फार गर्दी नसते. इथल्या निसर्गरम्य वातावरणात काही क्षण आनंदात घालवता येतील.

अरूणाचल प्रदेशमधलं तवांगही खास आहे. इथली टेकड्यांवर वसलेली गावं, बौद्ध मंदिरं, निसर्गरम्य वातावरण कोणालाही आकर्षित करेल. शहरातल्या धकाधकीपासून दूर तवांगमध्ये काही दिवस घालवता येतील.

हिमाचल प्रदेशमधलं किब्बर नावाचं स्थानही अनोखं आहे. या गावात आल्यावर वेगळीच अनुभूती



मिळते. आपण आकाशाच्या जवळ आलो आहोत, असा भास होतो.

पहलगामपासून बारा किलोमीटर अंतरावर आरू व्हॅली आहे. अत्यंत सुंदर अशी ही व्हॅली पाहायलाच हवी. इथे राहाण्यासाठी कॉटेज बनवण्यात आली आहेत.

आंध्र प्रदेशमध्ये अराकू व्हॅली आहे. इथल्या गलिकोंडा हिल्स परिसरात समुद्रसपाटीपासून ३००० फूट उंचीवर हे खोरं आहे. इथे मोकळ्या आकाशाखाली तंबू ठोकून निवांत राहता येतं.

उत्तराखंडमध्ये मुनस्यारी हे ठिकाण आहे. इथली बर्फाच्छादित हिमशिखरं आपल्याला खुणावतात. ■

करिअर




# कॉम्प्युटरशी करा दोस्ती

सध्या जिकडेतिकडे इंटरनेट आणि कॉम्प्युटरचा बोलबाला वाढला आहे. कॉम्प्युटरचं ज्ञान नसणारे विद्यार्थी बऱ्याच संधींपासून दूर राहतात. याउलट संगणकाचं अद्ययावत ज्ञान असेल तर तुमच्यासाठी बरीच कवाडं खुली होतात. कॉम्प्युटरशी संबंधित विविध अभ्यासक्रम आहेत, प्रशिक्षण वर्ग आहेत. कॉम्प्युटरचं प्राथमिक ज्ञान असल्यास तुम्ही बरंच काही करू शकता. सरकारी नोकरी, बँक किंवा कोणत्याही कंपनीत नोकरीसाठी अर्ज करायचा असेल तर कॉम्प्युरटचं ज्ञान आवश्यक असतं. सरकारी नोकरीतही कॉम्प्युटरचं ज्ञान असणं अनिवार्य करण्यात आलं आहे. एमएससीआयटीसारखे शासकीय कॉम्प्युटर प्रशिक्षण अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत.

या क्षेत्रातील जास्त ज्ञान हवं असेल तर ॲडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन हा अभ्यासक्रम करता येईल. बारावीनंतरही कॉम्प्युटरशी संबंधित बऱ्याच अभ्यासक्रमांना तुम्ही प्रवेश घेऊ शकता. कॉम्प्युटरशी संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी तुम्हाला मुळात या क्षेत्राची आवड असायला हवी. शालेय वयातही तुम्ही कॉम्प्युटर शिकू शकता. शाळेच्या अभ्यासासोबतच याचा अभ्यासही करू शकता. ॲडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर वेब डिझाइन ॲण्ड डेव्हलपमेंट, प्रोग्रामिंग, डिझायनिंग ॲण्ड डेव्हलपमेंट, नेटवर्किंग, डाटा एंट्री ऑपरेटर, ग्राफिक डिझायनर, अकाऊंटिंग, सॉफ्टवेअर टेस्टर आदी क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकता. तुमच्या क्षेत्राशी संबंधित इतर कौशल्यंही आत्मसात करू शकता. मग काय दोस्तांनो, कॉम्प्युटर शिकायला जाणार ना? ■

गडकाव्यांजली

## ।। राजकोट ।।



मालवण तालुका
सिंधुदुर्ग जिल्हा
किनारीदुर्ग प्रकारातला
पाहू राजकोट किल्ला ।।१।।

शिवरायांनी सिंधुदुर्ग नंतर
हेरला उंचवठा खडकाळ
तयावर निर्मिला राजकोट
गनिमांस तो कर्दनकाळ ।।२।।

आयताकृती आकारात
तीन एकरी परिसरात
सागरात मराठी मानबिंदू
उभा सिंधुदुर्ग नगरात ।।३।।

तीन बाजूने समुद्र
एका बाजूस जमीन
सिंधुदुर्ग रक्षणासाठी
राजकोट होता जामीन ।।४।।

सतराशे सहासष्ट साली
इंग्रज-करवीर तह होतो
तहानुसार राजकोटात
वखार जहासाठी मुभा मागतो ।।५।।

■■■

प्राणीजगत



# कासवांच्या दीर्घायुष्याचे रहस्य

मित्रांनो, कासवं दीर्घायुषी असतात. ती २०० वर्षांपेक्षा अधिक काळही जगू शकतात. जमिनीवर राहणारी, पाण्यातली, जमीन आणि पाणी अशा दोन्ही ठिकाणी राहणारी अशा विविध वर्गात मोडणाऱ्या कासवाच्या प्रजाती आहेत. डायनासोरच्या आधीपासून पृथ्वीवर कासवं अस्तित्वात आहेत. १२० पासून २०० ते २५० वर्षांपर्यंत किंवा त्याहूनही जास्त जगणारी कासवं आहेत. काही कासवं आकाराने खूप मोठी असतात. गालापागोस बेटांवरच्या कासवांचं वजन २०० किलोंपेक्षाही जास्त असतं. त्यांच्या पाठीचं कवच एक मीटरपेक्षा लांब असतं.

प्रत्येक प्राण्याचं ठरावीक आयुर्मान असतं. फुलपाखरं काही दिवसच जगतात तर काही प्राणी ५० ते ६० वर्षांपर्यंत जगतात. काही दीर्घायुषी माणसं १०० पेक्षा जास्त जगतात. पण त्यांची संख्या खूप कमी असते. असं असताना कासवं २०० पेक्षा जास्त वर्षं कशी बरं जगतात, हा प्रश्न पडतो. वाढत्या वयानुसार कासवांच्या शरीरातले महत्त्वाचे अवयव कमकुवत होत नाहीत आणि हेच त्यांच्या दीर्घायुष्याचं रहस्य आहे. माणूस तसंच इतर सजीवांचं शरीर हळूहळू थकत जातं. अवयवांचं कार्य मंदावतं. पण कासवांच्या बाबतीत असं होत नाही. त्यांच्या शरीरातल्या अवयवांची वाढ हळूहळू होत असते. जगण्यासाठी त्यांना जास्त ऊर्जेची गरज नसते.

हे जीव पाणी आणि अन्नाशिवाय बराच काळ जिवंत राहू शकतात. निसर्गाने त्यांना भरपूर आयुष्य दिलं असलं तरी कासवांच्या पिलांच्या पाठीवरचं कवच खूपच मऊ असतं. त्यामुळे ती सहज पक्ष्यांच्या तावडीत सापडतात. प्रदूषण, शिकारीसारखे धोकेही त्यांच्या संख्येवर मर्यादा आणतात. ■

हेल्थ वेल्थ



# घ्या फळांचा आस्वाद

मित्रांनो, आजूबाजूला नजर टाकताय ना? कोणत्याही ऋतुबदलाची चाहूल सर्वात आधी मंडईमध्ये लागते. तुमच्या घराच्या आसपास भाजीमंडई असेल तिथे एखादा फेरफटका मारल्यावर ऋतू बदललेलं लगेच समजतं. आताही तुम्हाला बाजारात उन्हाळ्याची चाहूल लागयला सुरुवात झाली असेल. उन्हाळ्याच्या सुरुवातीला कैरी, आवळे ही फळे बाजरपेठेत दिसू लागतात. आणखी काहीच दिवसांनी बाजारात आंब्याचं आगमन होईल. आंबा हे जवळपास सर्वच लहान मुलांचं आवडीचं फळ असतं, हो ना? तुमचंही हे सगळ्यात आवडतं फळ आहे ना?तर मग सज्ज व्हा आंब्यावर ताव मारण्यासाठी... लवकरच आंबे मुबलक प्रमाणात मिळू लागतील. तोतापुरी, हापूस अशा आंब्यांचा आस्वाद घेताना आरोग्याचं भान मात्र आवर्जून ठेवा. आवडत्या फळांवर ताव मारण्यासाठीही एक मर्यादा ठेवा. नाहीतर आजारी पडाल आणि एकाही फळाचा आस्वाद घेता येणार नाही. आंबा खाण्यापूर्वी थोडावेळ थंड पाण्यात भिजू द्या. नंतर सगळीकडून स्वच्छ करुनच आंब्याचा स्वाद घ्या. आंबा खाण्याआधी थोडं दूध घेतलं तर तो बाधत नाही. म्हणूनच आंबा खाण्याआधी थोडं दूध घ्या. एकावेळी जास्त आंबा खाऊ नका. आंब्याच्या अतिसेवनाने पोटदुखी सुरु होऊ शकते. तसंच द्राक्षं खाण्याआधी स्वच्छ धुवून घ्या. थोडावेळ पाण्यात भिजवून ठेवा, मग खा. उसाचा रस पिताना बर्फ न घालता प्या. कलिंगडावर मीठ घालून खा. आणि एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा, फळांचा आस्वाद घेताना अतिरेक मात्र होऊ देऊ नका! ■



टेक केअर

# काळजी वाटतेय?

दोस्तांनो, एखाद्याला सतत कशाची ना कशाची काळजी वाटत असते. मोठ्यांप्रमाणे लहान मुलंही ताण घेतात. स्पर्धा परीक्षा, खेळांच्या स्पर्धा, क्लासमधल्या परीक्षा यासारख्या गोष्टींची काळजी वाटणारी दोस्तमंडळी मोठ्या संख्येने पाहायला मिळतात. पण काळजी केल्यामुळे प्रश्न सुटत नाहीत. समस्या छोटी असो वा मोठी, तीन मार्गांनी आपण काळजी सोडून प्रत्यक्ष कृती करु शकतो.

*सर्वप्रथम आपल्याला कशाची काळजी वाटते हे जाणून घ्या. अनेकदा काळजीचं कारण माहीत असतं तर बरेचदा आपण उगाचच काळजी करत असतो. शाळेतली समस्या असेल किंवा घरातले प्रश्न असतील तर त्यांचा शोध घ्या. उगाचच ताण घेऊ नका.

* काळजी करत राहिल्याने प्रश्न सुटत नाहीत. एखादी कृती करूनच तुम्ही प्रश्न सोडवू शकता. त्यामुळे प्रयत्न करा. तुम्हाला पडत असणाऱ्या प्रश्नांची उत्तरं शोधा. एखादी समस्या आपल्या भावनांचा ताबा घेणार नाही याची काळजी घ्या. निकाल, परीक्षा, होमवर्क यांचा फार ताण घेऊ नका. कमी गुण मिळाले तर काय होईल, असा विचार करत बसू नका. त्याऐवजी मेहनत करा. भरपूर अभ्यास करा. कमी गुण का मिळाले हे शोधून काढा. त्यावर उपाय योजा. घाबरू नका.

* चिंता अथवा काळजी करण्याच्या सवयीमुळे तुम्ही एकटे पडू शकता. तेव्हा आपल्या प्रश्नांबद्दल मोकळेपणाने बोला. ■

# होली पर चंद्रग्रहण की छाया, राशियों पर भी होगा असर, इन लोगों को सावधान रहने की है जरूरत

इस वर्ष होली २५ मार्च को मनाई जाएगी. इसलिए २५ मार्च को होलिका दहन किया जाएगा और २६ मार्च को रंग खेला जाएगा. हिंदी तिथि के अनुसार फागुन शुक्ल पक्ष पूर्णिमा को होलिका जलाई जाती है और अगले दिन होली यानी रंगों के त्यौहार को मनाया जाता है. होली के दिन वर्ष का पहला चंद्र ग्रहण लगने वाला है. ज्योतिष के मुताबिक चंद्रग्रहण २५ मार्च को सुबह १०:३० से शुरू होगा जो दोपहर ३:०२ तक रहेगा. हालांकि भारतवर्ष में यह चंद्र ग्रहण दिखाई नहीं देगा, लेकिन जब भी इस प्रकार की कोई खगोलीय घटना होती है तो उसका प्रभाव सारे ब्रह्मांड पर पड़ता है और ब्रह्मांड में स्थित सभी राशियों पर भी कहीं ना कहीं इसका प्रभाव पड़ता है, जो सभी राशियों से संबंधित जातकों पर अर्थात व्यक्तियों पर भी इसका प्रभाव निश्चित ही कुछ ना कुछ पड़ता है.

चंद्र ग्रहण का सभी १२ राशियों पर होगा असर

मेष राशि के लिए यह चंद्र ग्रहण का मिला-जुला असर रहेगा और अपने क्रोध पर काबू रखें साथ ही श्री हरि विष्णु का जाप करें मंगल होगा.

वृषभ राशि के लोगों को विशेष सावधानी बरतनी चाहिए. उन्हें अपने स्वास्थ्य के प्रति विशेष ध्यान देना चाहिए. साथ ही महादेव की आराधना करें सभी प्रकार का मंगल होगा.

मिथुन राशि वालों के लिए यह ग्रहण शुभ संयोग लेकर आएगा. मानसिक तनाव दूर होगा. अटके हुए काम पूर्ण हो सकते हैं. स्वास्थ्य सही रहेगा तथा पारिवारिक सुख शांति बनी रहेगी. श्री हरि विष्णु का जाप करें और अधिक मंगल होगा.

कर्क राशि वालों के लिए विशेष सावधानी की आवश्यकता है. अपने स्वास्थ्य परिवार और मानसिक तनाव से बचने का प्रयास करें. महादेव का विशेष मंत्र ओम नमः शिवाय का जाप करें सभी प्रकार का मंगल होगा.

सिंह राशि वालों के लिए भी यह चंद्र ग्रहण समानता ठीक रहेगा. घर परिवार में खुशी आएंगी. लाभ प्राप्त होगा. व्यापार में उन्नति होगी. श्री हरि विष्णु का जाप करें सभी प्रकार का मंगल होगा.

कन्या राशि के लिए यह ग्रहण का मिला-जुला असर रहेगा. विशेष रूप से उन्हें अपने व्यापार और अपने स्वास्थ्य की चिंता करनी चाहिए. माता दुर्गा और महादेव का ध्यान करें उनका जाप करें सब मंगल होगा.

तुला राशि वालों के लिए भी यह ग्रहण ठीक-ठाक रहेगा. उन्हें अपने भौतिक विषयों पर विशेष ध्यान देना चाहिए. पत्नी के स्वास्थ की तरफ ध्यान देना चाहिए और अपने घर परिवार का विशेष ध्यान रखें महादेव के बीज मंत्र का जाप करें सब मंगल होगा.

वृश्चिक राशि वाले लोगों के लिए भी विशेष ध्यान देने की आवश्यकता है. उन्हें ग्रहण पर क्रोध नहीं करना चाहिए. झूठ नहीं बोलना चाहिए. झगड़ा नहीं करना चाहिए और किसी भी प्रकार के वाहन से चोट चपेट इत्यादि से सतर्क रहना चाहिए. माता दुर्गा का ध्यान करें और महादेव के बीज मंत्र का जाप करें सब कल्याण होगा.

